# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

मिशन बिगिन अगेन/शाळा बंद ठेवणेबाबत-ठाणे/आदेश/२० दि. २०/११/२०२०

**वाचले :-**

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.कोरोना/ २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दिनांक १४/०३/२०२०

४) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण/ २०२०/प्र.क्र.१४०/एस.डी-६, दि.१०/११/२०२०

---

**आदेश:-**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

साथ रोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ हा ठाणे जिल्ह्याच्या संपुर्ण क्षेत्रासाठी लागू करण्यात आलेला आहे. तसेच उपोद्घातातील अ.क्र. ३ अन्वये राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

उपोद्घातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांना जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोविड-१९ वर नियत्रंण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियम १० अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहेत.

उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये राज्यातील इयत्ता ९ वी ते १२ वी चे वर्ग, वसतीगृह व आश्रमशाळा दि.२३/११/२०२० पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

ठाणे जिल्हा क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव काही अंशी नियंत्रणात असला तरीही, जागतिक स्तरावरील कोविड उद्रेकाचे अवलोकन केले असता, युरोपमधील अनेक देशांमध्ये कोविड आजाराची दुसरी लाट आलेली दिसून येत आहे. तसेच दिल्लीसह अन्य काही राज्यातील कोरोना विषाणू प्रादुर्भावाची परिस्थिती पाहता, आपल्या देशात व राज्यामध्ये सुध्दा दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकत्याच पार पडलेल्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर साथरोग प्रसार रोखण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

उपरोक्त पार्श्वभुमीवर मी राजेश ज.नार्वेकर, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे उपोद्घातातील अ.क्र.१, २ व ३ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

१) संपुर्ण ठाणे जिल्हा क्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा व सर्व विद्यालये विद्यांर्थांसाठी दि.३१/१२/२०२० पर्यंत बंद ठेवण्यात येत आहेत. परंतु विद्याथ्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार ऑनलाईन शिक्षण पूर्ववत चालू राहील.



ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे – ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ – २५३४ ३६३६ / २५३४ १७३७ / ३९ ▪ ई-मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या पूर्व नियोजित सुरु असणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वी च्या पुरवणी परीक्षा पुर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे सुरु ठेवण्यात येतील.

उपरोक्त आदेश ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत व संपुर्ण ग्रामीण क्षेत्रात दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत अंमलात राहतील.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. त्याबाबतचे सर्व समन्वयन व संनियंत्रण, महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हा परिषदेचे शिक्षण विभागाचे जबाबदार अधिकारी यांनी करणेची आहे. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीतांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि. २०/११/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला असे.

**सही/-**
**(राजेश ज.नार्वेकर)**
**जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे**

**प्रत: माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव:-**

१. मा.पोलीस आयुक्त, ठाणे/नवी मुंबई.
२. मा.आयुक्त, महानगरपालिका, ठाणे/नवी मुंबई/कल्याण-डोंबिवली.
३. मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद ठाणे.
४. जिल्हा पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण).
५. आयुक्त, महानगरपालिका भिवंडी-निजामपूर/उल्हासनगर/मिरा-भाईंदर.
६. उपविभागीय अधिकारी, ठाणे/कल्याण/भिवंडी/उल्हासनगर.
७. जिल्हा शल्य चिकीत्सक,ठाणे/जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.ठाणे.
८. तहसीलदार (सर्व) / अपर तहसीलदार, मिरा-भाईंदर.
९. गटविकास अधिकारी, कल्याण/भिवंडी/अंबरनाथ/शहापूर/मुरबाड.
१०. मुख्याधिकारी,अंबरनाथ/कुळगांव-बदलापूर नगरपरिषद/शहापूर/मुरबाड नगर पंचायत.
११. शिक्षणधिकारी जिल्हा परिषद ठाणे/ शिक्षण विभाग, महानगरपालिका/ नगरपरिषद.
१२. जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे.

जिल्हाधिकारी ठाणे जिल्हा ठाणे सत्यमेव जयते

**(डॉ.शिवाजी पाटील)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे**